**"कृपया प्रसिद्धीसाठी......."**

# पुणे महानगरपालिका
# उद्यान विभाग
# वृक्ष प्राधिकरण

## "एक पेड माँ के नाम" अभियान अंतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम

## प्रेसनोट

पुणे महानगरपालिका उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरण मार्फत वृक्ष लागवड , संगोपन व संवर्धन विषयक कामे करण्यात येतात. शहरातील प्रदूषण कमी करणे, नदींचे पुनरुज्जीवन करणे व संवर्धन करणे याकरिता भारत सरकारचे जल शक्ती मंत्रालयाचे जलस्त्रोत, नदी विकास आणि गंगा पुनरुज्जीवन विभाग, राष्ट्रीय नदी संवर्धन संचनालय यांचे मार्फत पत्र क्र.F-11011/3/2025-NRCD-(E-299819) Date 17/09/2025 नुसार "एक पेड माँ के नाम" अभियान राबविण्याबाबत सूचना पारित करण्यात आलेल्या आहेत.

आज रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी "एक पेड माँ के नाम" अभियानाच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिका उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरण तसेच मे.कुमार बिल्डर्स - श्री.ललितकुमार जैन एन्टरप्राईजेस यांचे विद्यमाने "नमो पार्क", सी.टी.एस.नं.५२०,सर्व्हे नं.४४/१, केळेवाडी, पौड रोड, पुणे या ठिकाणी वृक्षारोपणाचा कार्यक्रम मा.श्री.नवल किशोर राम, आयुक्त,पुणे महानगरपालिका व मा.श्री.डी.आर. परिहार, भारतीय वनसेवा (निवृत्त) अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

सदर कार्यक्रमास उद्यान विभाग - वृक्ष प्राधिकरणाचे सह महापालिका आयुक्त श्री.अशोक दि.घोरपडे , पथ विभागाचे मुख्य अभियंता श्री.अनिरुद्ध पावसकर, अधिक्षक अभियंता श्री.अभिजीत आंबेकर, कार्यकारी अभियंता श्री.पुरुषोत्तम भूतडा, उप अभियंता श्री.शैलेश वाघोलीकर तसेच कोथरूड - बावधन क्षेत्रिय कार्यालयाचे महापालिका सहाय्यक आयुक्त श्री.विजय नायकल व वृक्ष प्राधिकरणाचे सहाय्यक उद्यान अधिक्षक श्री.रत्नाकर करडे व मे.कुमार बिल्डर्सचे अध्यक्ष श्री.ललितकुमार जैन हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे सुरुवातीस प्रमुख पाहुणे मा.श्री.नवल किशोर राम, आयुक्त,पुणे महानगरपालिका यांनी उपस्थित पुणे महानगरपालिकेचे अधिकारी व नागरिकांना वृक्षारोपण व पर्यावरण विषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच स्थानिक व दुर्मिळ अशी झाडे लावण्यावर भर देण्याबाबत सूचित केले व सध्याच्या अस्तित्वातील रस्त्यांवरील कोंडी दूर करण्याच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे काम त्वरित हाती घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन मा. आयुक्त यांनी केले.

महापालिकेच्या ताब्यात असलेल्या जागेवर मा.महापालिका आयुक्त यांनी स्वतःच्या आईच्या नावाने वृक्षारोपण करून "एक पेड माँ के नाम" वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ केला. त्यांच्यानंतर खात्यातील इतर अधिकारी तसेच उपस्थित नागरिकांनी देखील आपल्या आईच्या नावाने वृक्षारोपण केले. यामध्ये कडुलिंब, खिरणी, कदंब, मोहा, बेल, पांगारा इ. स्थानिक जातीच्या एकूण ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली.

सदर कार्यक्रमाच्या दरम्यान महापालिका आयुक्त मा. श्री नवल किशोर राम यांनी पथ विभागातील अधिकाऱ्यांबरोबर बालभारती पौड रोड ची पाहणी केली. सदर जागा पाहणी दरम्यान या रस्त्याची अलाइनमेंट तसेच जागेवरील एकूण परिस्थितीची पाहणी केली. रस्त्याच्या कुठल्या भागामध्ये रस्ता एलिवेटेड करण्यात येणार आहे याची देखील माहिती मा.आयुक्त , पुणे महानगरपालिका यांनी घेतली. एन्व्हायरमेंटल क्लिअरन्स (ईसी) साठी लवकरात लवकर अर्ज करून इसी प्राप्त करण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे तसेच रस्त्याच्या कामासाठी काढण्यात येणाऱ्या वृक्षांच्या बदल्यात नवीन भरपाई वृक्ष लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात यावीत असे आदेश दिले .

सदर "एक पेड माँ के नाम" अभियानाच्या अनुषंगाने पौड फाटा ते बालभारती रस्त्याच्या कामास अडथळा करणाऱ्या वृक्षांच्या बदल्यात नवीन भरपाई वृक्ष लागवड करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली असून पुणे महानगरपालिकेच्या ताब्यातील जागेवर सदर वृक्षलागवड उपक्रम यापुढे ही सुरु राहणार आहे.

**(डॉ.अशोक दि. घोरपडे)**
**सह महापालिका आयुक्त**
**उद्यान विभाग**
**पुणे महानगरपालिका**